**श्री सद्गुरुंची आरती १**

सगुण हे आरती निर्गुण ओंवाळूं ।
कल्पनेचें घृत घालूं दीप पाजळूं ।। १ ।।

ओंवाळूं आरती सद्गुरुनाथा श्रीगुरुनाथा ।
भावें चरणकमळावरी ठेविला माथा ।। धृ ।।

अविद्येचा मोह पडला उपडोनी सांडूं ।
आशा मनशा तृष्णा काम क्रोध कुरवंडू ।। आरती ।। २ ।।

सद्गुरूचे पूजन केले षोडशोपचारे ।
रामानंद जीवन्मुक्त झाला संसारी ।। आरती ।। ३ ।।